# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०५/२०१८

**१) विवाहीतेला शारिरीक व मानसिक त्रास दिल्याने अंगावर मातीचे तेल टाकुन आत्महत्येस प्रवृत्त केल्याने स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/०५/२०१८ पर्यत यातील फिर्यादीची मृतक मुलगी हीचे लग्न दिनांक २१/०५/२०१७ ला आरोपी पती सोबत जाती रिवाजाने होवुन पतीचे घरी राहत असतांना यातील आरोपी याने मृतक पत्नीस आपले वडीला कडुन वेळोवेळी १०,०००/—रु. व सोन्याची अंगठी घेवुन ये, असे बोलुन नेहमी हुंडयाची मागणी करुन आणले नाहीतर नेहमी मारझोड करुन शारिरीक व मानसिक त्रास दिल्याने पतीचे त्रासामुळे स्वत:चे अंगावर रॉकेल टाकुन आत्महत्येस प्रवृत्त करुन तिचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४९८(अ),३०६ भादवी. सहकलम् ३,४ हुंडा प्रतीबंधक कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) समर्शिबल मोटार पंप, पाईप, नायलॉन रस्सा, पॅनल, निप्पल, सॉकेटची चोरी :—**

दिनांक १६/०५/२०१८ चे २१.३० ते १७/०५/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील हेमंत मुरलीधर ढेंगे वय ३३ वर्ष, रा. लाखनी हा आपले घराचे प्लॉट वर जावुन समर्शिबल मोटार पंप चालु केली असता ती चालु झाली नाही बोरवेल जवळ जावुन पाहीले असता १ फोरमॅक कंपनीची समर्शिबल १ एचपी, काळा रंगाचा पाईप २०० फुट, निळया रंगाचा नॉयलान रस्सा, पॅनल, निप्पल, सॉकेट असा एकुण २५,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी हेमंत मुरलीधर ढेंगे वय ३३ वर्ष, रा. वार्ड क्र. १२ लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी :—**

दिनांक १५/०५/२०१८ चे २१.०० ते १६/०५/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी आकाश तुलाराम सेलोकर वय २० वर्ष, रा. नेहरु वार्ड शहापुर याचे घरा समोर ठेवलेली काळया रंगाची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस मोटार सायकल किंमती २०,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणावरुन विट उचलुन डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/०५/२०१८ चे ००.११ वाजता दरम्यान यातील फिर्यादी लोकेश दामोधर नेवारे वय १६ वर्ष, रा. मेंढा भंडारा हा खर्रा घेण्याकरीता घरुन जात असतांनी यातील आरोपीने फिर्यादीस खर्रा मागीतला असता फिर्यादीने माझ्या कडे खर्रा नाही आहे खर्रा घेण्याकरीता जातो असे बोलले असता आरोपीने अंगणातील विट उचलुन फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/०५/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही घराजवळील विनय बोरकर यांचे अंगणात बसली असता यातील आरोपी ही बिनाकारण शिव्या देत असल्यामुळे फिर्यादीने आरोपीस शिव्या का देतेस! असे हटकले असता आरोपीने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १६/०५/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही घराबाहेर कपडे वाळवीत असतांना यातील आरोपी व त्याची पत्नी ही फिर्यादी कडे येवुन तु माझ्या मुलीची बदनामी दुसऱ्याकडे सांगते असे बोलुन फिर्यादीचे पाठीवर बुक्यांनी मारुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,३२३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

७) संगनमत करुन लोखंडी रॉडने डोक्यावर व हातावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १६/०५/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रुपेश प्रकाश हटवार वय २७ वर्ष, रा. कोदुर्ली हा प्रफुल शेंडे रा. सावरला याचे कडे जेवना करीता जावुन त्याचे सोबत व तुळशिदास मेश्राम चौकात खर्रा घेण्यास जात असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस बोलावुन गव्हाचे कट्टे गाडीवर घेवुन जाणार काय असे विचारले असता फिर्यादीने गणेश भजीपाले रा. सावरला यास बोलावले असता दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीस माझे पत्नीचे कोणत्यातरी ड्रायव्हर सोबत लफडा आहे त्याचे नाव तुम्हाला माहीत आहे का असे बोलुन आरोपीतांनी लोखंडी कवच्याने व लोखंडी रॉडने डोक्यावर व हातावर मारुन जखमी केले तसेच नंदेश्वर भाजीपाले यांना सुध्दा बोटाला चावा घेवुन जखमी केल्याने फिर्यादी रुपेश प्रकाश हटवार वय २७ वर्ष, रा. कोदुर्ली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

८) बॅनर लावुन सार्वजनीक मालमत्तेचे विद्रूपीकरण केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १७/०५/२०१८ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात व्यक्तीने नगरपरिषदेचे शहरातील विद्युत खांबावर परवानगी न घेता अनाधीकृतपणे खांबावर बचपन प्ले स्कुल नावाची जाहीरात बॅनर लावुन सार्वजनीक मालमत्तेचे विद्रूपीकरण केल्याने फिर्यादी प्रकाश कटकवार वय ३९ वर्ष, रा. कस्तुरबा गांधी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३ सार्वजनीक मालमत्ता विद्रूपीकरण प्रतीबंधक कायदा १९९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. आतराम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

९) बॅनर लावुन सार्वजनीक मालमत्तेचे विद्रूपीकरण केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १७/०५/२०१८ चे ०८.४५ वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात व्यक्तीने नगरपरिषदेचे शहरातील लक्ष्मी सभागृह समोरील एलएईडी विद्युत खांबावर २) लक्ष्मी लॉन समोरील एलईडी विद्युत खांबावर ३) सरस्वती बुक सेंटर बजाज कॉम्प्लेक्स समोरील एलईडी विद्युत खांबावर ४) आदीत्य डेकोरेटर बजाज कॉम्प्लेक्स समोरील विद्युत खांबावर ५) रॉयल ट्रॅव्हल्स बजाज कॉम्प्लेक्स एलईडी विद्युत खांबावर जेल पोलीस वसाहती जवळील डिपीवर ७) दारु बंदी ऑफीस समोरील एलईडी विद्युत खांबावर परवानगी न घेता अनाधीकृतपणे खांबावर युनाटेड १८ या नावाचे जाहीरात बॅनर लावुन सार्वजनीक मालमत्तेचे विद्रूपीकरण केल्याने फिर्यादी संग्राम प्रकाश कटकवार वय ३९ वर्ष, रा. कस्तुरबा गांधी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३ सार्वजनीक मालमत्ता विद्रूपीकरण प्रतीबंधक कायदा १९९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. आतराम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

१०) अवैधरित्या जनावरांची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १७/०५/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक क्र. एमच ४९/०१७९ किंमती किंमती ६,००,०००० /–रु मध्ये एकुण ३५ लाल रंगाचे विरगोरे जनावरे किंमती ७०,०००/–रु चे ट्रक मध्ये डांबुन, कोंबुन त्यांना निदर्यतेची वागणुक व चारापाण्याची व्यवस्था न करता व वैद्यकीय प्रमाणपत्र सोबत न बाळगता अवैद्यरित्या वाहतुक करीत असतांनी मिळुन आल्याने फिर्यादी मानिक भिवाजी जिवतोडे वय ३८ वर्ष, रा. पिंपळगाव सडक यांचे लेखी रिपोर्ट व कागदपत्रावरुन वरून पोलीस स्टेशन कारधा येथे ११(१)(ड)(ई) प्रा.नि.का. सहकलम ९ प्रा. सं. अधी सहकलम ६६/१९२ मोवाका अन्वये. गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**११) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०९/०५/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही दिनांक ०९/०५/०२१८ चे १४.०० वाजता दरम्यान घरी कोणाला काही न सांगता घरुन निघुन गेली व सायंकाळी घरचे लोकांनी संपर्क केले असता मी उदया घरी परत येणार अशी बोलली असता दुसऱ्या दिवशी फिर्यादी यांनी मोबाईवर संपर्क केले असता मोबाईल बंद येत असल्याने तिचा गावात व नातेवाहीकात शोध घेतला मिळुन न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात ईसमाने पळवुन नेले असावे असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाढवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१२) विवाहीतेचा जळुन उपचारा दरम्यान मृत्यु :–**

दिनांक १६/०५/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. पल्लवी सोमेश्वर कुंभरे वय २३ वर्ष, रा. वेडवा ही घरी चुल पेटवुन स्वयपांक करीत असतांना अचानक स्वत: जळाल्याने तिला औषधोपचारा करीता ग्रामीण रुग्नालय येथे भरती करुन पुढील उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बिसने यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**१३) गळफास लावुन उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिनांक १२/०५/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील मृतक क्रिष्णा ज्ञानेश्वर बारेकर वय १६ वर्ष, वाणी यांने त्याचे स्वत:चे घरी दिनांक ०९/०५/२०१८ ला गळफास घेतल्याने ग्रामीण रुग्नालय पवनी येथे नातेवाईकांनी उपचारा करीता भरती केल्याने तेथील डॉक्टरांनी सामान्य रुग्नालय भंडारा येथे रेफर केल्याने मृतक हा दिनांक १२/०५/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कन्नाके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. लांजेवार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**१४) अवैध देशी,विदेशी, हातभट्टी दारु/ जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १७/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, तुमसर, सिहोरा, आंधळगाव, साकोली, लाखनी, अडयाळ व लाखांदुर येथे अवैध देशी, विदेशी, हातभट्टी दारू/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १३३६ लिटर हातभंट्टी दारू १६४२० किलो सडवा + १००० किलो मोहा फुल किंमती २३,७६,४००/–रु. तसेच ४५४ लिटर ७७० मिली लिटर देशी/विदेशी दारु + टाटा सफारी गाडी किंमती १४,१४,६२०/–रु. तसेच जुगारातुन किंमती ३५२/–रु. तसेच असा एकुण किंमती ३७,९१,३७२/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १७/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०२ तीन सिटर वाहनाकरीता– ०७ ईतर वाहनांवरती – १२३ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.